उपविभागीय अधिकारी
सिंदखेडराजा यांचे कार्यालय
प्राप्त दि 13.1.17
आवक क्र. 360
निकाली काढण्याचा दि
शाखा
उ.वि.अ. सि. राजा

# प्रारंभिक अधिसूचना

क्र.कावि/भूसंपादन/मं.अ./२०७३/२०१६.
उपविभागिय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी,
सिंदखेडराजा यांचे कार्यालय,
दिनांक :- २९/११/२०१६.

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

ज्याअर्थी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारर्दशकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यांत आलेली शासकीय अधिसुचना,महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी,२०१५,महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, असाधारण क्र.१६० महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक ११.०९.२०१५ क्रमांक संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/भाग- २/अ-२ दिनांक १८.०२.२०१६ ( यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे.) याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड ( झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखादया जिल्हयातील १०००० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात,अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचने नुसार समुचित शासन असलेल्या,बुलडाणा जिल्हयाच्या जिल्हाधिका-यास या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी ( यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते,ज्याच्या स्वरुपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसूचि दोन मध्ये दिलेले आहे,आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतूदीन्वये याव्दारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे,या सोबत जोडलेल्या अनुसूची तीन दिलेली आहेत;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे,

आणि ज्याअर्थी,कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्स्थापना या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, या सोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे;

ज्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतूदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतू आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतूदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार,जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क ( महाराष्ट्र ) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) व्दारे विहीत केल्या प्रमाणे भूमि अभिलेखाच्या अदयावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी,उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी,उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागिय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, सिंदखेड राजा यास पदनिर्देशीत करीत आहे.

<u>अनुसूची- एक</u>

जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांकः- ८३/२०१२-१३

गावः- गारगुंडी. तालुकाः- देऊळगावराजा जिल्हाः- बुलडाणा

| भूमापन क्रमांक किंवा गट क्रमांक व आवश्यक जमिनीचे अंदाजित क्षेत्रफळ (चौ.मी मध्ये) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | नगर भूमापन क्रमांक | मोकळी जागा (चौ.मी) | बांधकाम क्षेत्र (चौ.मी) | एकूण क्षेत्रफळ (चौ.मी) | अ.क्र | नगर भूमापन क्रमांक | मोकळी जागा (चौ.मी) | बांधकाम क्षेत्र (चौ.मी) | एकूण क्षेत्रफळ (चौ.मी) |
| १ | ३१ | निरंक | २१.१० | २१.१० | ३४ | ११२ | निरंक | ११५.४० | ११५.४० |
| २ | ३२ | निरंक | ४५.९० | ४५.९० | ३५ | ११३ | निरंक | ४४.३० | ४४.३० |
| ३ | ३३ | निरंक | ४१.२० | ४१.२० | ३६ | ११४ | निरंक | ७७.५० | ७७.५० |
| ४ | ३४ | निरंक | १६.५० | १६.५० | ३७ | ११५ | निरंक | ६६.०० | ६६.०० |
| ५ | ३५ | निरंक | ३२.६० | ३२.६० | ३८ | ११६ | निरंक | ३४.९० | ३४.९० |
| ६ | ३६ | निरंक | १४.४० | १४.४० | ३९ | ११७ | निरंक | ४१.२० | ४१.२० |
| ७ | ३७ | निरंक | ३३.०० | ३३.०० | ४० | ११८ | निरंक | ७७.४० | ७७.४० |
| ८ | ३९ | निरंक | २५.४० | २५.४० | ४१ | ११९ | निरंक | ६३.२० | ६३.२० |
| ९ | ७३ | निरंक | २७.१० | २७.१० | ४२ | १२० | निरंक | ७५.३० | ७५.३० |
| १० | ७५ | निरंक | २६.६० | २६.६० | ४३ | १२७ | निरंक | ५९.१० | ५९.१० |
| ११ | ७६ | निरंक | २०.७० | २०.७० | ४४ | १२९ | निरंक | ५९.१० | ५९.१० |
| १२ | ७७ | निरंक | ४०.०० | ४०.०० | ४५ | १३० | निरंक | ४७.५० | ४७.५० |
| १३ | ७८ | निरंक | २१.४० | २१.४० | ४६ | १३१ | निरंक | १३७.१० | १३७.१० |
| १४ | ७९ | निरंक | २९.२० | २९.२० | ४७ | १३२ | निरंक | २६.०० | २६.०० |
| १५ | ८० | निरंक | २९.२० | २९.२० | ४८ | १३३ | निरंक | ८२.१० | ८२.१० |
| १६ | ८१ | निरंक | ३१.१० | ३१.१० | ४९ | १३४ | निरंक | ६१.०० | ६१.०० |
| १७ | ८२ | निरंक | ३१.७० | ३१.७० | ५० | १३५ | निरंक | ३३.५० | ३३.५० |
| १८ | ८३ | निरंक | ३४.०० | ३४.०० | ५१ | १३६ | निरंक | ५६.४० | ५६.४० |
| १९ | ८४ | निरंक | ७०.१० | ७०.१० | ५२ | १४९ | निरंक | ४९.९० | ४९.९० |
| २० | ८५ | निरंक | ९५.०० | ९५.०० | ५३ | १५० | निरंक | ४०.५० | ४०.५० |
| २१ | ८६ | निरंक | ५७.७० | ५७.७० | ५४ | १५१ | निरंक | ९९.५० | ९९.५० |
| २२ | ८७ | निरंक | २६.१० | २६.१० | ५५ | १५२ | निरंक | ६०.०० | ६०.०० |
| २३ | ८८ | निरंक | १९.७० | १९.७० | ५६ | १५३ | निरंक | ११३.३० | ११३.३० |
| २४ | ८९ | निरंक | ४७.५० | ४७.५० | ५७ | १५४ | निरंक | ९६.७० | ९६.७० |
| २५ | ९० | निरंक | ३३.७० | ३३.७० | ५८ | १५५ | निरंक | ३८९.८० | ३८९.८० |
| २६ | ९१ | निरंक | ६५.१० | ६५.१० | ५९ | १५६ | निरंक | १३.१० | १३.१० |
| २७ | ९२ | निरंक | ३६.६० | ३६.६० | ६० | १५७ | निरंक | ४५.५० | ४५.५० |
| २८ | ९३ | निरंक | २१.१० | २१.१० | ६१ | ६४ | निरंक | १७.६० | १७.६० |
| २९ | ९४ | निरंक | २०.८० | २०.८० | ६२ | ६५ | निरंक | २१.७० | २१.७० |
| ३० | ९५ | निरंक | १९.०० | १९.०० | ६३ | ११० | निरंक | १६.२५ | १६.२५ |
| ३१ | ९६ | निरंक | २०.६० | २०.६० | ६४ | १३८ | निरंक | ५६.४० | ५६.४० |
| ३२ | ९७ | निरंक | ८३.८० | ८३.८० | ६५ | १५८ | निरंक | १०५.६० | १०५.६० |
| ३३ | १११ | निरंक | ७७.९० | ७७.९० | | | | | |
| | एकूण | ०० | १२१५.८० | १२१५.८० | | | ०० | २२८२.२५ | २२८२.८५ |

मोकळी जागा ०० चौ.मी.

बांधकाम क्षेत्र ३४९८.६५ चौ.मी.

एकूण ३४९८.६५ चौ.मी क्षेत्रफळ.

<u>अनुसूची- दोन</u>

<u>सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण</u>

प्रकल्पाचे नांव :- खडकपुर्णा प्रकल्प,देऊळगावराजा

प्रकल्प कार्याचे वर्णन :- खडकपुर्णा प्रकल्पासाठी मौजे गारगुंडी ता.देऊळगावराजा जि. बुलडाणा येथील विशेष बाबी अंतर्गत मंजूर पुनर्वसनानुसार जुन्या घरांचा ३४९८.६५ चौ.मी. खाजगी घरांचा भूसंपादन प्रस्ताव.

समाजाला मिळणारे लाभ :- या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा होणार आहे.त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मीती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी,शेतकरी,भूमिहीन शेतमजूर यांना

रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात ( STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे.

अनुसूची- तीन

| | | |
|---|---|---|
| बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे | :- | महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक आरपीए-२००८/प्र.क्र. २८९/र-१/महसुल व वन विभाग, मुंबई दि. ४ नोव्हेंबर २०१० अन्वये खडकपुर्णा प्रकल्प ता. देऊळगांव राजा जिल्हा बुलडाणा या प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात मौजे गारगुंडी ता. देऊळगांव राजा जि. बुलडाणा या गावातील क्षेत्र किंवा घरे हे महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९ किंवा त्यापुर्वीच्या अधिनियमाच्या निकषापेक्षा कमी बाधित होत असल्याने सदरच्या प्रस्तावास "खासबाब" म्हणुन मान्यता मिळाली आहे.<br>तसेच ग्रामपंचायत गारगुडी ठराव क्र.७ दि. २३/०७/२०११ अन्वये नमुद आहे की, मौजे गारगुंडी येथिल ४१% पुनर्वसन यापुर्वीच पुर्ण होऊन पुनर्वसनाची कामे पुर्ण झालेली आहे. त्यानंतर नोव्हेंबर २०१० मध्ये गारगुंडी येथिल उर्वरीत ५९% चे पुनर्वसन मंजुर झालेले आहे. त्यानुसार गावातील उर्वरीत गांव नमुना आठ प्रमाणे दिलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार सहखुशीने नविन गांवठानात भूखंड व नागरी सुविधा पाहिजे नाही असे लेखी दिलेले आहे.<br>संबंधित भूधारक यांनी रुपये १००/- चे मुद्रांक मुल्यांचे अभिलेखावर अभिलेख ED 987592 दि. १८/०७/२०११ (नोंद क्र. १८४८ दि. १८/०७/२०११) चे मुद्दा क्र. २ अन्वये आम्हास आपण देऊ केलेल्या जागा व कोणत्याही सोई सवलती आम्हाला नको आहे असे लेखी दिलेले असल्याने बाधित व्यक्तीचे विस्थापण करण्यास भाग पाडणारी कारणे बाबत माहिती निरंक आहे. |

अनुसूची- चार

| | | |
|---|---|---|
| सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश. | :- | नवीन भूसंपादन कायदा २०१३ कलम (६) अन्वये सामाजिक परिणाम निर्धारणातून सूट आहे. |

अनुसूची- पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल

| | | |
|---|---|---|
| अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम | :- | कमांक:आरपीए-२०१५प्र.क्र१२९(२)/र-१,- भूमिसंपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३(२०१३ चा ३० )(यापुढे उक्त अधिनियम असे वाचावे) कलम ४३ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व इतर सर्व शक्तींचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याव्दारे खालील अनुसूचीच्या रकाना २ मधील प्रकल्पाच्या अनुषंगाने जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा यांना,उक्त अधिनियमाच्या उद्दीष्टाकरीता प्रशासक,पुनर्वसन व पुनर्वसन व पुनर्स्थापना म्हणून नियुकत करीत आहे. |
| ब. प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता | :- | जिल्हा पुनर्वसन अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा. |
| क. ज्या अधिसूचने व्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली त्या अधिसूचनेचा तपशील. | :- | महसूल व वन विभाग,मंत्रालय मुंबई<br>दिनांक १०/०६/२०१५ |
| टीप | :- | उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपविभागीय अधिकारी, कार्यालय सिंदखेडराजा,ता.सिंदखेडराजा जि. बुलडाणा या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल |

दिनांक:२९ / ११/२०१६
ठिकाण:- बुलडाणा

डॉ.विजय झाडे
जिल्हाधिकारी,बुलडाणा